# मळभ

*A nonlove story*



## वैजयंती डांगे

# मळभ

*A nonlove story*

## वैजयंती डांगे

ई साहित्य प्रतिष्ठान

मळभ A nonlove story (malabha : A Nonlovestory)

कथा

लेखिका : वैजयंती डांगे

Email :- vaijayanti62@gmail.com

Ph : 9922627096

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan®2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

या कथेतील सर्व पात्रे

सर्व प्रसंग

सर्व नांवे

आणि सर्व स्थळे

काल्पनिक आहेत.

पण कथा अजिबात काल्पनिक नाही.

एकदम रिऍलिटी.

# मळभ

“Hi Good Morning !”

सगळ्यांना  wish करून नीता आपल्या जागेवर बसली.

मेधा - ohh अरे वा आज साडी? काय विशेष?

नीता - काही नाही ग सहजच.

मेधा - पण काहीही म्हण ह तू हल्ली एकदम मूड मध्ये असतेस. नक्कीच काहीतरी विशेष आहे ?

नीता - अग नाही ग विशेष काय असणार. म्हणाले साड्यांना जरा उन्हे दाखवावीत.

मेधा - नाही हं! तसे नाही. हल्ली तुझा मूड पण छान असतो. नसेल सांगायचे तर राहू देत.

नीता - नाही गं! तसे नाही. सांगेन कधीतरी .

दिवसागणिक नीताच्या वागण्यात बदल होत होता. हल्ली तर ती आपल्यातच मग्न असते.  एकदम टापटीप राहायला लागली आहे. काम करता करता स्वतःशीच गुणगुणत असते. कामात पण फारसे लक्ष नसतं. काम करता करता ती बरेचदा कुणाशी तरी online chat करत असते. हल्ली तर टिकलीपासून चपलेपर्यंत कडक matching असते. बहुतेक करून आम्हा बायकांना office मध्ये फोन येतो तो  नवऱ्याचा, मुलांचा किंवा फार तर फार सासू सासऱ्यांचा; आणि ते सुद्धा कुठल्यातरी कामाची आठवण करून देण्यासाठी किंवा नवीन कुठले तरी काम सांगण्यासाठी. पण हल्ली नीताला वरचेवर कुणाचा तरी फोन यायचा; आणि फोन आला कि ती उठून बाहेर जायची.

आज तर कमालच झाली. फोन आल्यावर ती बाहेर गेली ती जवळ जवळ २० मिनीटानी परत आली.

“काय गं कुणाचा एवढा फोन? काही प्रॉब्लेम तर नाही ना? आणि हल्ली कुणाशी ग chat करत असतेस?”

“नाही! काही नाही गं,  general timepass!” असे म्हणून ती कामाला लागली.

मी पण विषय सोडून दिला. तिच्या आयुष्यात काहीतरी वेगळे घडतेय हे मला जाणवत होते पण नेमके काय आणि जे घडते आहे ते चांगले कि वाईट हे कळत नव्हते पण तिच्यात चांगला बदल होत होता हे नक्की.  ती खूप आनंदात असायची. मी आता ठरवले कि आता तिला काही विचारायचे नाही एक दिवस ती स्वतःहूनच सगळे सांगेल याची खात्री होती.

आज तर नीता खूपच नटून थटून  आली होती. विचारले तर म्हणाली “काही नाही गं! मूड खूप छान होता म्हणून .....”

मी फक्त तिच्याकडे पाहून हसले. दिवसभर खरंच ती खूप छान मूड मध्ये होती. काम करता करता हसत होती, गुणगुणत होती. माझ्या मनात मात्र शंकेची पाल चुकचुकत होती.

खरे तर माझी आणि तिची ओळख अवघी गेल्या तीन साडेतीन वर्षातली. पण म्हणतात, मने जुळली कि मैत्री व्हायला वेळ लागत नाही. तसंच काहीसे आमच्या बाबतीत झाले होते. नीता एक गोड स्वभावाची चार चौघीत उठून दिसणारी हुशार मुलगी. लग्नाआधी तिचे आयुष्य म्हणजे भरपूर अभ्यास आणि भरपूर मजा. ती गाणे पण छान म्हणते. घरात बाहेर सगळयांची लाडकी नीतू होती ती. पण लग्न झाले आणि तिचे आयुष्य एकदमच बदलून गेले. घरातील माणसांच्या वागण्याचे एक एक किस्से जेव्हा ती सांगते तेव्हा अंगावर अक्षरशः काटा  येतो. इतकी गुणी मुलगी सून म्हणून मिळाली. पण  तिची

कदर घरात कुणालाच नव्हती. आता तिची दोन्ही मुले मोठी झाली आहेत. तेव्हा तिने एक धाडसी निर्णय घेतला. घरातल्यांचा विरोध पत्करून ती नोकरीसाठी घराबाहेर पडली आणि आमच्या ऑफिस मध्ये जॉईन झाली.

आज घरी जाताना मी पुन्हा तिला छेडले

“कुणाशी ग रोज एव्हढे चाट करत असतेस?”

“काही नाही गं, खूप वर्षांनी कॉलेज ची जुनी मैत्रीण fb वर भेटली. त्यामुळे आम्ही रोज खूप गप्पा मारतो. मधली वर्ष पुसून टाकायचा प्रयत्न करतो.”

“ओके! म्हणून तू हल्ली छान मूड मध्ये असतेस.”

तिने हसत हसत हुंकार दिला नि ती घरच्या रस्त्याला वळली. पण कुठे तरी तिच्या वागण्याचा मेळ काही मला लागत नव्हता ती खरे बोलत नाहीये असे वाटत होते.

गेले दोन दिवस नीता जरा उदास उदासच होती.

“काय ग काय झाले? बरे वाटत नाहीये का? कि पुन्हा घरात काही .........”

“काही नाही गं! असेच...” ती म्हणाली.

“तुझी कॉलेज ची मैत्रीण दोन तीन दिवसात online भेटली नाही का?” मी सहजच खडा टाकला.

तेव्हा ती अनवधानानी पटकन म्हणून गेली "हो ग तो चार दिवस रजेवर आहे न त्यामुळे चैनच पडत नाही.”

“अग "तो" कोण तू तर मैत्रीण म्हणाली होतीस ना ?”

“अगं नाही ग मैत्रीणच.  मी चुकून तो म्हणाले.”

मी “हो का !” म्हणून विषय तिथेच सोडला.

नंतर सहा आठ महिने असेच गेले.

नीता मजेत होती.

“अग नीता! काय झाले? का  रडतेस एवढी? घरी काही भांडण झाले आहे का?”

एक नाही नि दोन नाही. ती एक सारखी रडतच होती. कसे बसे तिला शांत केले. गार पाणी प्यायला दिले.

थोडी शांत झाल्यावर तिने  विचारले "मेधा संध्याकाळी थोडा वेळ काढशील? मला तुझ्याशी खूप बोलायचे आहे".

संध्याकाळी ऑफिस  सुटल्यावर आम्ही बाहेर पडलो. बाहेर रिपरिप पाऊस पडत होता. वातावरण कुंद झालं होतं. छत्र्या सांभाळत, चिखल टाळत, आणि गाड्यांचे शिंतोडे

टाळत आम्ही जवळच्या C.C.D. मध्ये गेलो. कोपऱ्यातले एक रिकामे टेबल पाहून बसलो. मी दोन कोल्ड कॉफी घेऊन आले. नीता पुन्हा रडायला लागली. मी पण तिला रडू दिले.

हळू हळू शांत होत ती म्हणाली “मेधा मी तुझ्याशी खोट बोलले गं! मला कुणी कॉलेज ची जुनी मैत्रीण वगैरे नव्हती भेटली गं.”

“मग? कोण होता 'तो'?” मी हळूच विचारले

“अगं, साधारण एक दीड वर्षापूर्वी मी गम्मत म्हणून एका सोशल site वर माझे profile टाकले होते. मग मला फ्रेन्डशिप साठी मेल यायला लागल्या. प्रथम रिप्लाय करायची हिम्मत नाही झाली. मी सगळ्या मेल डिलीट करून टाकत होते. पण मग एकदा माझ्या मनात आले कि काय हरकत आहे रिप्लाय करायला? समोरची व्यक्ती चांगली नसेल तर त्याला डिलीट करू शकतो कि आपण. असा विचार करून मी रवीच्या मेलला रिप्लाय

केले. आणि मग अधून मधुन आमचे चाटिंग सुरु झाले. त्यातून एकमेकांबद्दल आणि एकमेकांच्या कुटुंबाबद्दलची माहिती मिळाली.

“तो खूपच छान बोलायचा. माझी नेहमी तारीफ करायचा.

“मग आम्ही एकमेकांना मोबाईल नंबर दिले.  एक दिवस त्यानी फोन केला. तो खूप छान बोलला. माझे खूप कौतुक केले. माझ्या आवाजाची इतकी तारीफ केली कि मलाच अवघडल्यासारखे झाले.  मग आम्ही एकमेकांचे फोटो सुध्दा शेअर केले. तो म्हणाला मला तू साडीत खूप आवडतेस म्हणून मी वरचे वर साडी नेसायला लागले. हळू हळू आम्ही एकमेकात कधी आणि कसे गुंतत गेलो कळलेच नाही. आम्ही एकमेकांच्या सहवासाचा अनुभव घेत होतो.”

मी हळूच म्हणाले “पण काल्पनिक ना?”

ती पण उसासा सोडून “हो” म्हणाली.

“तो माझे खूप लाड करायचा. मोकळया रस्त्यावर हातात हात घालून फिरता फिरता आम्ही bedroom  मध्ये कधी पोचलो कळलेच नाही.”

मी फक्त एक दीर्घ श्वास सोडला आणि म्हणाले “अरे बापरे!”

ती थोडा वेळ थांबली. मग मीच विचारले मग पुढे काय झाले ?

“कसे सांगू कळत नाही.”

शेवटी शब्द गोळा करून ती पुढे सांगू लागली. “मला त्याचा काल्पनिक सहवास खूप आवडायचा. त्याच्या सुंदर मिठीतून उबदार मिठीत आणि नंतर घट्ट मिठीत मी विरघळून गेले.  रविवारची सुट्टी सुद्धा आम्हाला नकोशी वाटायची.

“खूप वर्षांनी मी अशी आनंदात राहत होते. घरात काय चालले आहे, कोण कसे वागते आहे, याची मला परवाच राहिली नव्हती. त्यांच्या वागण्याचा माझ्यावर काहीच फरक पडत नव्हता. कारण मी अंतर्बाह्य रवी मय झाले होते. वीस एकवीस वर्षाच्या मुली प्रमाणे त्याच्या बरोबर प्रणय सुखात दंग होते.”

“नीता, पण हे सगळे करताना आपण कुठे तरी चुकतोय हे सगळे पुढे कुठे जाणार आहे असे तुला कधीच वाटले नाही का?”

ती थांबली. एका घोटात  पाण्याचा ग्लास रिकामा केला. एक घोट coffee प्याली. मग पुन्हा ती सांगायला लागली.

“सुरवातीला त्याच्या बरोबर प्रणय प्रसंग रंगवताना मला नको वाटायचे. आणि नंतर logg off केल्यावर माझ्या मनात अपराधी पणाची भावना यायची. माझी मलाच लाज वाटायची. वाटायचे कि मी नवऱ्याबरोबर प्रतारणा तर करत नाही ना? माझे मन मलाच खायचे. ’नीता, बस! इथेच थांब!’ म्हणायचे. दुसऱ्या दिवशी त्याला हे सांगितल्यावर तो म्हणायचा जाऊदेत तुला जर त्रास होत असेल तर आपण इथेच थांबुयात. तुला आनंद मिळावा म्हणून मी हे सगळे करतो. पण खरे तर तू एवढा त्रास का करून घेत्येस? आपण तर हे सगळे फक्त बोलतो प्रत्यक्षात तर आपण कधी भेटणार पण नाही. असे म्हणून तो बोलणे बंद करायचा.

“त्यामुळे मला त्याच्याबद्दल तर जास्तच आपलेपण वाटायचा.”खरंच! किती समजून घेतो हा’ मला असे वाटायचे. पण मग मीच बेचैन व्हायची आणि पुन्हा त्याला हाक द्यायची आणि त्याच उत्कटतेनि तो मला प्रतिसाद द्यायचा. मी नकळत त्याच्या प्रेमात पडले होते.

रात्री सुद्धा त्याचीच स्वप्न पहायची. सुरवातीला नवऱ्यासमोर अपराधी वाटायचे पण नंतर ते पण वाटेनासे झाले.”

“पण हे सगळे असे का झाले असा विचार तुझ्या मनात कधी आला नाही का?”

“खरे सांगू मेधा लग्न झाल्यावर प्रत्येक मुलगी मनात अनेक स्वप्न घेऊन उंबऱ्यावरचे माप ओलांडते ग! सासरच्या सर्व माणसात तिचा जवळचा आणि हक्काचा असतो तो फक्त तिचा नवरा. प्रेम, कौतुक, विश्वास, आपलेपणा अशा छोट्या छोट्या अपेक्षा असतात गं त्याच्याकडून. पण त्या थोड्यासुद्धा पूर्ण झाल्या नाहीत तर दुखः, पराजय, अपमान उरात घेऊन ती बाई निमूटपणे  संसार रेटते खरा; पण त्यात तिचा जीव नसतो गं. ती फक्त एक सामाजिक बांधिलकी राहते. माझ्या संसारात  अंहं, सासू सासऱ्यांच्या संसारात मी फक्त कर्तव्याच्या घाण्याला जुंपलेला बैल आहे बघ.”

“म्हणजे तू तुझी भावनिक भूक भागवण्यासाठी वेगळा  पर्याय शोधलास. बरोबर?”

“अरे हो! खरच कि ग किती समर्पक नाव दिलेस तू ह्या नात्याला. पण माझे नशिबच खराब आहे बघ.”

“अग नाही गं. असे का वाटते आहे तुला? या गोष्टी तरुण पिढीत सर्रास घडतात बघ. याला ghosting असे म्हणतात. बघ, म्हणजे समोरची व्यक्ती अस्तित्वात असते. पण अदृश्य असते. ती व्यक्ती नेमकी कोण आहे आपल्यला माहित पण नसते. आणि  आपण त्या व्यक्ती बरोबर अनेक गोष्टी शेअर करतो. आणि आपल्या मनातली घुसमट मोकळी करतो. त्यात फार काही गैर आहे असे नाही. आजची तरुण पिढी हे सगळे खूप सहजपणे करते आहे. हं, आपल्याला पचायला थोडे जड जाते हे खरे आहे. मग तरी तू एवढी उदास का? तुझ्या घरी काही कळले आहे का?”

"नाही गं, पण आता आमचे संबंध संपले आहेत. कारण आता त्याचे लग्न झाले आहे. लग्न झाल्याबरोबर त्यांनी सांगितले कि आता नो फोन कॉल्ल्स, नो मेसेज, नो मेल्स. फक्त कधीतरी on line chat. म्हणजे बघ न त्याला मी इतकी हवी होते आणि एका क्षणात सगळे बदलले. जणू काही हा रामाचाच अवतार आहे."

"अग शांत हो! खरे तर आपण यात भावनिक रित्या फारसे गुंतायचे नसते. या तरुण पिढीकरता इंटरनेट friendship म्हणजे फक्त गरज सरो नि वैद्य मरो असेच असते. आजचा जमाना use & throw चा आहे बघ. व्यक्तीला सुद्धा आपल्या गरजेपुरता वापरायचे आणि नंतर विसरून जायचे. तू त्याच्यासाठी तर बिलकुलच एवढी upset होऊ नकोस. कदाचित तो तेवढ्या लायकीचा पण नसेल."

"म्हणजे?"

"म्हणजे... अग नेट वर chat करताना गोड गोड बोलायला काय लागते? कदाचित त्यांनी त्याची जी काही माहिती तुला दिली ती खरी सुद्धा नसेल. त्याचे नाव सुद्धा खोटे असू शकते. शिवाय प्रत्यक्षात त्याचा स्वभाव तसाच असेल असे पण नाही. आता तो त्याच्या बायकोशी तसेच वागत असेल असे नाही. अशी इतक्या फालतू गोष्टींसाठी आपली मनस्थिती खराब करून नाही घ्यायची."

पाच मिनिटे ती शांत निशब्द झाली मी फक्त तिची प्रतिक्रिया निरखून पाहत होते.पाचव्या मिनिटाला ती एकदम उठून उभी राहिली. माझे दोन्ही हात हातात गच्च धरले.

"खरंच गं! हे माझ्या लक्षातच आले नाही." आणि ती एकदम मनमोकळी हसली. तिच्या चेहऱ्यावर मूळ रंग आले. मुसळधार पावसानंतर कोवळं ऊन पडावं तशी ती तजेल झाली.

आणि आम्ही दोघी C.C .D. मधून बाहेर पडलो.

मळभ दूर होऊन आकाश मोकळे झाले होते.

X--------------------------------------------------------X

# ई साहित्य प्रतिष्ठान

## एक दम : तिन कामं

अभिनंदन मित्रांनो. तुम्ही हे छोटुंसं पुस्तक वाचून संपवलंत. थोडा टाईम पास झाला. पण टाईम फ़ुकट नाही गेला. त्या बदल्यात बरंचसं शहाणपण मिळालं. ऑनलाईन मैत्रीत काय करावं. काय करू नये. आणि घरातल्या माणसांशी कसं वागावं. त्यांना कसं वागवावं. मैत्री कशी करावी. आयुष्य आनंदाचं असतंच. आपण ते दुःखी करून घेतो. स्वतःहून. एका छोट्याशा पुस्तकातून किती धडे मिळतात. तेही मनोरंजनासह. अशी खूप सारी ई पुस्तकं घेऊन ई साहित्य प्रतिष्ठान गेली काही वर्षं फ़ुकट वाटत असते. अक्षरशः शेकडो पुस्तकं. एकाहून एक भारी. सुंदर. मस्त. झक्कास. लय भारी.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबपेजवर सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी द्या आणि बना VIP सभासद. एका दमात तीन कामं. एकतर तुम्ही VIP सभासद बनता. ज्या दहा लोकांना तुमच्यामुळे फ्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आहे ना : एक दम : तीन कामं.
संपर्क साधा : esahity@gmail.com

आपले नम्र

टीम ई साहित्य